# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## दिनांक 26-08-2016 रोजी (का.प.क्र.05) संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.

शुक्रवार दिनांक 26 ऑगस्ट 2016 रोजी (दि.23/8/16 ची तहकूब सभा का.प.क्र .05) मा.सभापती श्री.मोहन धन्नुलाल मेघावाले यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची स्थायी समितीची सभा महापालिका कार्यालयातील मलीक अंबर स्थायी समिती सभागृह येथे सकाळी 10-45 वा सुरू झाली.सभेला मा.अति.आयुक्त, नगरसचिव श्री.दिलीप सुर्यवंशी व संबधीत अधिकारी तसेच खालील प्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

| | |
|---|---|
| 1. | स.स.श्री.कमलाकर शामराव जगताप |
| 2. | स.स.श्री.सिताराम इसराम सुरे |
| 3. | स.स.श्री.मकरंद माधवराव कुलकर्णी |
| 4. | स.स.श्री.गजानन भानुदास मनगटे |
| 5. | स.स.श्री.रावसाहेब राधाकिसन आमले |
| 6. | स.स.श्री.विकास प्रकाश एडके |
| 7. | स.स.श्री.राजगौरव हरिदास वानखेडे |
| 8. | स.स.श्री.कैलास लक्ष्मण गायकवाड |
| 9. | स.स.श्री.शेख समीना शेख इलियास |
| 10. | स.स.श्री.अजीम अहेमद रफिक |
| 11. | स.स.श्रीमती किर्ती महेंद्र शिंदे |
| 12. | स.स.श्रीमती संगिता सुभाष वाघुले |
| 13. | स.स.श्रीमती मनिषा बाळासाहेब मुंडे |

**विषय क्र. 24 :**

आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला की, औरंगाबाद महानगरपालिकेमध्ये सेवा सुविधा अद्ययावतीकरण करणे, कामात पारदर्शकता ठेवणे ई. कामा संदर्भात विविध विभागांचे संगणकीकरण करण्यात येत आहे. माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात वेळोवेळी होणारे बदल व अद्ययावतीकरण नुसार प्रशासकीय कामकाजामध्ये बदल होणे आवश्यक आहे.

औरंगाबाद महानगरपालिकेतील संगणकीकरणा अंतर्गत Mainet (शासनाने उपलब्ध करून दिलेले) द्वारे e-Governance प्रकल्प अंमलबजावणी अस्तित्वात असलेले संकेतस्थळ अद्ययावत करणे, विविध सेवा ऑनलाईनरित्या उपलब्ध करून देणेची कामे प्रगतीपथावर आहे. या व्यतिरिक्त M-Governance अंमलबजावणी, मोबाईल Apps विकसीत करणे, डाटा सेंटर व डाटा रिकव्हरीसाठी अद्ययावत डाटा सेंटर तयार करणे, कॉल सेंटर उभारणे, Networking व IT Infra System अद्ययावतीकरण करणे, GIS द्वारे मनपाचे उत्पन्न वाढविणे कॉल सेंटरच्या माध्यमातून नागरीकांना त्वरीत सेवा उपलब्ध करून देणे जुन्या रेकॉर्डचे Digitization करणे इत्यादी सर्व सुविधा व सेवा Online पध्दतीने उपलब्ध करून देणे गरजेचे आहे.

औरंगाबाद महानगरपालिकेकडील अस्तित्वात असलेली माहिती व तंत्रज्ञान विभागाकडे आवश्यक असलेले तांत्रिक मनुष्यबळ व या विषयातील तज्ञ तसेच पायाभुत सुविधा उपलब्ध नसल्यामुळे विविध

प्रकारची माहिती तंत्रज्ञानावर आधारीत प्रकल्प अंमलबजावणी व अनुषंगिक कामे करणे शक्य नसल्यामुळे या क्षेत्रातील म्हणजेच माहिती तंत्रज्ञान सल्लागाराची नितांत आवश्यकता आहे.

राज्य शासनाने शासन निर्णय दिनांक 01/07/2014 व तदनंतर औरंगाबाद महानगरपालिकेने आवश्यक असणाऱ्या बाबी यामध्ये सुधारीत करून देण्याची विनंती शासनाकडे केली होती. त्याची प्रत **परिशिष्ठ अ** वर जोडण्यांत येत आहे. दिनांक 01/07/2014 च्या शासन निर्णयानुसार माहिती व तंत्रज्ञान क्षेत्रात काम करणाऱ्या तज्ञ सल्लागार कंपन्यांची मनुष्यबळ व तांत्रिक मार्गदर्शन उपलब्ध होणेसाठी खालीलप्रमाणे नमुद पाच कंपन्यांची नियुक्ती करून उक्त कंपन्यापैकी कोणत्याही एका कंपनीमार्फत अस्तित्वातील माहिती व तंत्रज्ञानद्वारे पुरविण्यात येणाऱ्या सेवा सुविधा अद्ययावतीकरण करणेस आदेशित केलेले आहे. दिनांक 01/07/2014 च्या निर्णयातील कामाचा व्याप विचारात घेवून औरंगाबाद महानगरपालिकेसाठी स्मार्ट सिटी योजनेतील करावयाची कामे विचारात घेण्यासाठी सुधारित कामाचा व्याप शासनाच्या मंजुरीसाठी पाठविण्यात आला होता. त्यानुसार महानगरपालिकेच्या सुधारीत प्रस्तावास मान्यता मिळाली. त्याची प्रत **परिशिष्ठ ब** वर जोडण्यांत येत आहे.

शासनाने नेमुन दिलेल्या सर्व कंपन्यांना सादरीकरण करण्याकरीता महानगरपालिकेत पाचारण करण्यांत आले होते.

01. M/s Accenture 2. M/s Deloitte 3. M/s Ernst & Young
04. M/s KPMG 5. M/s PWC

उक्त पैकी M/S PWC व M/s Ernst & Young यांनी दिनांक 21/06/2016 रोजी मुलाखतीसाठी हजेरी नोंदविली व सविस्तर सादरीकरण समितीसमोर केलेले आहे. M/s Accenture, M/s Deloitte, M/s KPMG हजर नव्हते. त्यांना दिनांक 27/06/2016 रोजी पुन्हा बोलावण्यात आले. M/s KPMG यांनी दिनांक 22/06/2016 रोजी व M/s Accenture यांनी दिनांक 26/06/2016 रेजी ई मेल द्वारे येण्यासाठी असमर्थता दर्शविली. तंत्रज्ञान सल्लागार निवड करण्यासाठी नेमण्यात आलेल्या समितीने M/s PWC व M/s Ernst & Young पैकी सर्वात जास्त गुण प्राप्त केलेल्या M/s Ernst & Young या कंपनीचे तंत्रज्ञान सल्लागार म्हणुन निवड शासन निर्णयातील सूचनेप्रमाणे केली आहे.

औरंगाबाद महानगरपालिकेसाठी आवश्यक त्या कामासाठी निवड केलेल्या कंपनीतर्फे लागणारे मनुष्यबळ एक सिनियर कन्सलटंटसाठी रू.2,20,000/- व दोन कंन्सलटंटसाठी रू.3,20,000/- असे एकूण रू.5,40,000/- (कर वगळून) प्रतिमाह खर्च अपेक्षित आहे. या कंपनीकडून एक वर्षासाठी काम करून घेणे योग्य राहील. प्रकल्प व्यवस्थापन खर्च (खर्च बाजु पान क्र.E-52) या लेखाशिर्षातंर्गत असलेल्या उपलब्ध तरतुदीमधुन हा खर्च करण्यात येईल. करिता वरील प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर मान्यतेस्तव सादर.

| | |
|---|---|
| मा.सभापती | : तहकूब सभेला सुरूवात करण्यात येते. |
| श्री.कैलास गायकवाड | : विषय क्र.24 बाबत सविस्तर माहिती दयावी. या योजनेचा स्मार्टसिटी साठी उपयोग होऊ शकतो काय ? |
| सिस्टीम मॅनेजर | : शासन निर्णय दिं 1 जुलै नुसार आपण आयटी कन्स्ल्टंट व स्मार्ट सिटी साठी जे अहवाल स्वीकारले ही कामे होण्याकरीता एजन्सी निश्चित करणेसाठी प्रस्ताव दिला या एजन्सीच्या माध्यमातून आयटी साठी लागणारी सर्व प्रोसेस पुर्ण करणार आहे. |
| श्री.कैलास गायकवाड | : एजन्सी शासन की महापालिका नियुक्त करीत आहे. |
| सिटीम मॅनेजर | : शासनाने पाच एजन्सी नियुक्त केल्या आहे त्यापैकी प्रात्येक्षिक बघुन मा.आयुक्ताच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमून त्यातील एक एजन्सी नेमायची होती एक एजन्सी नियुक्त केली आहे. |
| श्रीमती किर्ती शिंदे | : एजन्सी काय काम करणार आहे प्रेझेन्टेशन दाखविण्यात यावे. |

श्री.विकास एडके : संगणक विभागाचा खर्च किती आता सध्या किती कर्मचारी कार्यरत आहे.

श्री.राजगौरव वानखेडे : या प्रस्तावानुसार महिना पाच लक्ष खर्च होणार कोण करणार आहे.

सिस्टीम मॅनेजर : महापालिकेच्या प्रकल्प विभागासाठीच्या लेखाशिर्षकातून खर्च होणार आहे.

श्री.राजगौरव वानखेडे : यापूर्वी ईआरपीसाठी 2 कोटी खर्च केले फायदा आजही नाही.अनेकदा पीएमसी नेमून प्रकल्प राबविण्यात आले सर्व फेल गेले. वार्डातील विकास कामासाठी पैसे नाही सांगता पीएमसीला पैसे वाटप करीत राहणार काय ?

सिस्टीम मॅनेजर : ईआरपी संदर्भात चौकशी चालू आहे.

श्री.राजगौरव वानखेडे : 2007 पासून ईआरपी संदर्भात चौकशी चालू आहे ते काम पुर्ण नाही तोच दुसरे काम काढले पीएमसीची पात्रता काय असावी

मा.अति.आयुक्त : ईआरपी संदर्भात 2007 पासून चौकशी चालू होती ऑडीट ऑब्जेक्शन होते. हार्डवेअर 90-95 लक्ष खर्च केले सॉप्टवेअर वापर झाला नाही तासेरे ओढले आहे. शासन स्तरावर अहवाल मागीतला आहे. कार्यवाही होत आहे या प्रस्तावानुसार महापालिका खरेदी करीत नाही शासन स्थरावर सस्था नेमल्या त्यापैकी एक एजन्सी त्यांचे प्रेझेन्टेशन बघून नेमली आहे एजन्सी अॅज अे अॅडव्हायझर म्हणून काम करणार आहे.

श्री.राजगौरव वानखेडे :कर्मचारी किती व खर्च किती होणार आहे.

मा.अति.आयुक्त : शासनाने एजन्सीची निवड केली त्यांचे दर ठरविलेले आहे जो खर्च दिला तो लागणार आहे महापालिकेचा खर्च वाचविण्याचा प्रयत्न आपण करू सीएसआर च्या माध्यमातीन हो खर्च घेता येईल का ते बघीतले जाईल.

श्री.राजगौरव वानखेडे : सीएसआर मध्ये खर्च करता येईल तसे प्रस्तावात नमूद करायला पाहिजे होते.सीएसआर पैसे देण्यास तयार आहे महापालिकेवर त्यांचा विश्वास पाहिजे.

श्री.सिताराम सुरे : ही सिस्टम अमलात आणून महापालिकेस काय फायदा होणार आहे. श्री.गुप्ता साहेब असतांना ईआरपी योजना आणली अमलबजावणी केली नाही.

मा.अति.आयुक्त : याची अमलबजावणी करावी लागणार आहे यावर खर्च होणार आहे.

श्री.राजगौरव वानखेडे : मनपाने खर्च न करता सीएसआर च्या माध्यमातून हा खर्च करावा.

श्री.रावसाहेब आमले : एजन्सी नेमली सभागृहाला विश्वासात घेतले नाही.

मा.अति.आयुक्त : प्रशासनाच्या स्तरावर जी कार्यवाही करायची होती ती केली आता मान्यतेसाठी ठेवले आहे

श्री.सिताराम सुरे : स्थगित ठेवावे आयटी कंपनीला बोलवून पुढील सभेत माहिती घेऊन निर्णय घ्यावा

मा.सभापती : आताच सभागृहात झालेल्या चर्चेप्रमाणे या प्रस्तावानुसार हा खर्च महानगरपालिकेला कारावा लागणार नाही. सीएसआर च्या माध्यमातून कसा करता येईल त्याप्रमाणे कार्यवाही करावी, दुरूस्तीसह प्रस्ताव मंजुर करण्यांत येतो.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद महानगरपालिकेमध्ये सेवा सुविधा अद्ययावतीकरण करणे, कामात पारदर्शकता ठेवणे ई. कामा संदर्भात विविध विभागांचे संगणकीकरण करण्यात येत असून माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात वेळोवेळी होणारे बदल व अद्ययावतीकरण नुसार प्रशासकीय कामकाजामध्ये बदल होणे आवश्यक असल्यामुळे तसेच राज्य शासनाने शासन निर्णय दिनांक 01/07/2014 व तदनंतर औरंगाबाद महानगरपालिकेने आवश्यक असणाऱ्या बाबी यामध्ये सुधारीत करून देण्याची विनंती शासनाकडे केली होती, दिनांक 01/07/2014 च्या शासन निर्णयानुसार माहिती व तंत्रज्ञान क्षेत्रात काम करणाऱ्या तज्ञ सल्लागार कंपन्यांची मनुष्यबळ व तांत्रिक मार्गदर्शन उपलब्ध होणेसाठी शासनाने पाच कंपन्यांची नियुक्ती करून या

कंपन्यापैकी कोणत्याही एका कंपनीमार्फत अस्तित्वातील माहिती व तंत्रज्ञानद्वारे पुरविण्यात येणाऱ्या सेवा सुविधा अद्ययावतीकरण करणेस आदेशित केलेले असून दिनांक 01/07/2014 च्या निर्णयातील कामाचा व्याप विचारात घेवून औरंगाबाद महानगरपालिकेसाठी स्मार्ट सिटी योजनेतील करावयाची कामे विचारात घेण्यासाठी सुधारित कामाचा व्याप शासनाच्या मंजुरीसाठी पाठविण्यात आला होता, त्यास शासनाने पत्र क्र.No.GAD-DIT088/14/2016-DIR-DIT(MH) अन्वये मंजुरी दिल्यानुसार M/S PWC व M/s Ernst & Young यांनी दिनांक 21/06/2016 रोजी मुलाखतीसाठी हजेरी नोंदविली व सविस्तर सादरीकरण समितीसमोर केलेले असल्यामुळे, तंत्रज्ञान सल्लागार निवड करण्यासाठी नेमण्यात आलेल्या समितीने M/s PWC व M/s Ernst & Young पैकी सर्वात जास्त गुण प्राप्त केलेल्या M/s Ernst & Young या कंपनीचे तंत्रज्ञान सल्लागार म्हणुन निवड शासन निर्णयातील सूचनेप्रमाणे केलेल्या निवडीस मान्यता देण्यांत येते.

औरंगाबाद महानगरपालिकेसाठी आवश्यक त्या कामासाठी निवड केलेल्या कंपनीतर्फे लागणारे मनुष्यबळ एक सिनियर कन्सलटंटसाठी येणारा खर्च रू.2,20,000/- व दोन कंन्सलटंटसाठी रू.3,20,000/- असे एकुण रू.5,40,000/- (कर वगळून) प्रतिमाह अपेक्षित खर्चास मंजुरी देण्यांत येते. सदर कंपनीकडून एक वर्षासाठी काम करून घेणे व सदरील खर्च प्रकल्प व्यवस्थापन खर्च (खर्च बाजु पान क्र.E-52) या लेखाशिर्षातंर्गत असलेल्या उपलब्ध तरतुदीमधुन करण्यासही मान्यता देण्यांत येते. तसेच सभागृहात झालेल्या चर्चेप्रमाणे सदरील खर्च शक्यतो सीएसआर च्या माध्यमातून कसा करता येईल त्याप्रमाणे कार्यवाही करावी, या दुरूस्तीसह प्रस्तावास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 25 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.46 येथे जिन्सी पावर हाऊस बाजुला रणछोडदास गिरणी येथे आरक्षित मनपाच्या मालकीच्या जागेत नवीन शाळा इमारत बांधण्यासाठी सन 2015-16 सा.बां. विभागाच्या जिल्हा दरसूचीनुसार रक्कम रू.49,99,200/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले असून त्यास मा.आयुक्त महोदय यांनी मा.स्थायी समिती समोर सादर करणेस्तव शिफारस केली आहे.

सदरील कामाचा खर्च सन 2016-17 या आर्थिक वर्षा अंतर्गत प्रो.पुवर बजेट विकास इमारती शाळा, दवाखाने या लेखाशिर्षाअंतर्गत रक्कम रू.49,99,200/- ची तरतुद उपलब्ध असून त्या अंतर्गत करण्यात येईल.

त्यानुसार उपरोक्त कामाचे अंदाजपत्रक र.रू.49,99,200/- चा प्रस्ताव मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

मा.सभापती : विषय मंजूर करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वॉर्ड क्र.46 येथे जिन्सी पावर हाऊस बाजुला रणछोडदास गिरणी येथे आरक्षित मनपाच्या मालकीच्या जागेत नवीन शाळा इमारत बांधण्यासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रू.49,99,200/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 26 :**

आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहे की, शासकीय कर्करोग रूग्णालय, औरंगाबाद यांना पाणी पुरवठा करण्यासाठी औरंगाबाद महानगरपालिकेच्या ज्युब्लीपार्क जलकुंभ येथून 200 व 150 मी.मी. व्यासाची डीआयके-7 जलवाहीनी टाकण्याच्या कामास रक्कम रूपये 45,16,605/- किमतीच्या प्रस्तावाला वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई यांचेमार्फत निर्गमीत शासन निर्णय दिनांक 03/06/2015 अन्वये प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे. सदर रक्कमेचा भरणा महानगरपालिकेकडे करावा म्हणजे Full Deposit Work अंतर्गत जलवाहीनी टाकण्याच्या कामाची कार्यवाही करण्यात येईल, असे महानगरपालिकेने कार्यालयीन पत्र क्र. जा.क्र./मनपा/उअ/पापु/जास्था/781/ 2015 दिनांक 03/01/2015 अन्वये मा.अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व कर्करोग रूग्णालय,

औरंगाबाद यांना कळविले होते. मा.उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद येथे दाखल जनहित याचिका क्र.86/2011 च्या अनुषंगाने औरंगाबाद महानगरपालिकेमार्फत कार्यवाही करण्यात येत आहे. मा.अधिष्ठाता यांनी दिनांक 09/10/2015 रोजीच्या पत्रान्वये र.रूपये 45,16,605/- चा धनादेश महानगरपालिकेकडे जमा केला आहे. मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार सदरील काम तीन महिन्याच्या आत पूर्ण करावयाचे आहे.

सदरील अंदाजपत्रकास मा.स्थायी समिती सभेने विषय क्र.28 दिनांक 05/11/2015 अन्वये मंजुरी प्रदान केलेली आहे. सदरील कामासाठी निविदा कार्यवाही केली असता प्रथम वेळेस तीन निविदा प्राप्त झाले. प्रथम निविदेच्या वेळेस निविदा अटी व शर्तीनुसार वार्षिक उलाढाली संदर्भाने दोन निविदाधारकांनी कागदपत्रे सादर केलेली नसल्याने स्पर्धा होण्याच्या दृष्टीने आर्थिक उलाढालीची अट शिथील करून या कामासाठी दिनांक 21/04/2016 रोजी फेर निविदा करण्यात आली असता दोनच व्यापारी निविदा प्राप्त झाल्या. त्यामुळे दुसऱ्या वेळेस निविदेस सात दिवसांची मुदतवाढ देण्यात आली. या कार्यवाही अंतर्गतही दोनच व्यापारी निविदा प्राप्त झाल्या. तद्नंतर पुन्हा निविदेस सात दिवसांची मुदतवाढ देण्यात येऊन निविदा कार्यवाही केली असता, दोन व्यापारी निविदा प्राप्त झाल्या. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

01. मे.शेख कन्स्ट्रक्शन, संजयनगर, औरंगाबाद
    अंदाजपत्रकीय रक्कमेपेक्षा 7.86% जास्त दर (रक्कम रूपये 37,69,138.58)
02. मे.पी.बी. पाटील कन्स्ट्रक्शन, सम्राटनगर, दर्गा रोड, औरंगाबाद
    अंदाजपत्रकीय रक्कमेपेक्षा 17.55% जास्त दर (रक्कम रूपये 41,07,753.01)

सदरील कामाचे अंदाजपत्रक महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळाच्या सन 2013-14 दरसुचीनुसार तयार करण्यात आलेले आहे. सन 2013-14 दरसुचीत डीआके-7 पाईपचे दर उपलब्ध नसल्यामुळे खुल्या बाजारातील उत्पादक कंपनीच्या दरांचा समावेश अंदाजपत्रकात करण्यात आला आहे. प्राप्त निविदा दर लक्षात घेता दिनांक 15/07/2016 रोजी कंत्राटदार मे.शेख कन्स्ट्रक्शन यांच्याशी वाटाघाटी केल्या असता अंदाजपत्रकीय र.रूपये 34,94,473/- इतक्या दराने काम करण्यास गुत्तेदाराने सहमती दर्शविलेली आहे.

करीता शासकीय कर्करोग रूग्णालय, औरंगाबाद यांना पाणी पुरवठा करण्यासाठी औरंगाबाद महानगरपालिकेच्या ज्युब्लीपार्क जलकुंभ येथुन 200 व 150 मीमी व्यासाची डीआयके-7 जलवाहीनी टाकण्याच्या कामाची मे.शेख कन्स्ट्रक्शन, संजयनगर, औरंगाबाद यांची अंदाजपत्रकीय दराची निविदा रक्कम रूपये 34,94,473/- मा.स्थायी समिती सभेसमोर मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

मा.सभापती : विषय मंजूर करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शासकीय कर्करोग रूग्णालय, औरंगाबाद यांना पाणी पुरवठा करण्यासाठी औरंगाबाद महानगरपालिकेच्या ज्युब्लीपार्क जलकुंभ येथून 200 व 150 मी.मी. व्यासाची डीआयके-7 जलवाहीनी टाकण्याच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या अंदाजपत्रकीय दरापेक्षा 7.86% जास्त दराचे निविदाधारक मे.शेख कन्स्ट्रक्शन, संजयनगर, औरंगाबाद यांचेशी झालेल्या वाटाघाटी अंती ठरल्यानुसार अंदाजपत्रकीय र.रूपये 34,94,473/- इतक्या दराने संबंधीत एजन्सीमार्फत काम करून घेण्याच्या निविदेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 27 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, शिक्षण विभागात कार्यरत असलेल्या एकूण 138 बालवाडी शिक्षका व 14 बालवाडी सेविका यांना जा.क्र.मनपा/शिक्षण/2016/15, दि.06/01/2016 रोजीच्या आदेशान्वये दिनांक 26/11/2015 ते दिनांक 30/04/2016 (उन्हाळयाच्या सुटया लागेपर्यंत) पर्यंत तात्पुरती नियुक्ती/मुदतवाढ देण्यात आलेली आहे. सद्यस्थितीत 138 पैकी 135 बालवाडी शिक्षिका या चालु शैक्षणिक वर्षांत शाळेत दिनांक 15/06/2016 पासुन कार्यरत आहेत. उर्वरीत 03 बालवाडी शिक्षिका या

गेल्या सहा महिन्यापासुन गैरहजर आहेत. सदर बालवाडी शिक्षिका यांचे दरमहा मानधन रु.5000/- व बालवाडी सेविका यांचे मानधन दरमहा रु.2000/- इतके आहे.

सद्यस्थीतीत खालील बालवाडी शिक्षिका व सेविका या दिनांक 15.06.2016 पासून कार्यरत आहेत. आवश्यकता व मुदतवाढ देणे बाबत मुख्याध्यापक यांनी शिफारस केलेली आहे.

| अ.क्र. | बालवाडी शिक्षिकेचे नाव | कार्यरत शाळा |
|---|---|---|
| 1. | श्रीमती प्रभा वामनराव (वाघ) पाठक | म.न.पा.शाळा बेगमपुरा |
| 2. | श्रीमती मंगला फुलूके | म.न.पा. भावसिंगपुरा |
| 3. | श्रीमती नंदा नलावडे | म.न.पा.शाळा भावसिंगपुरा गांव |
| 4. | श्रीमती कल्पना धनबिज | म.न.पा.शाळा भावसिंगपुरा |
| 5. | श्रीमती निता जावळे | म.न.पा.शाळा पडेगांव |
| 6. | श्रीमती छाया उत्तमराव जगताप | म.न.पा.शाळा पडेगांव |
| 7. | श्रीमती सुलोचना धनसिंग वाणी | म.न.पा.शाळा पडेगांव कॉलनी |
| 8. | श्रीमती गिता ब्राम्हणकर | म.न.पा.शाळा मिटमिटा |
| 9. | श्रीमती मृणाल पंडीत | म.न.पा.शाळा के.प्रा.शा. बेगमपुरा |
| 10. | श्रीमती वंदना विष्णु गायकवाड | बालवाडी अप्पावाडी |
| 11. | श्रीमती सिमा चंद्रकांत बाराबोटे | म.न.पा. शाळा पडेगांव कॉलनी |
| 12. | श्रीमती शाहीन तबस्सुम | म.न.पा. आरेफ कॉलनी |
| 13. | श्रीमती नुरजहॉ बेगम | म.न.पा. शाळा बेगमपुरा |
| 14. | श्रीमती आम्रपाली इंगळे | म.न.पा.शाळा ज्युब्लीपार्क |
| 15. | श्रीमती उर्मिला हिरालाल भातावाले | म.न.पा.शाळा ज्युब्लीपार्क |
| 16. | श्रीमती असफिया बेगम तुराब अली | म.न.पा.शाळा ज्युब्लीपार्क |
| 17. | श्रीमती शोभा देविदास भगत | म.न.पा.शाळा मिटमिटा |
| 18. | श्रीमती शोभा सिताराम घंटे | म.न.पा.शाळा नागेश्वरवाडी |
| 19. | श्रीमती मथुरा रुपालाल जैस्वाल | म.न.पा.शाळा बडीगिरणी |
| 20. | श्रीमती शेख तरन्नुम शेख इब्राहिम | म.न.पा.शाळा बडीगिरणी |
| 21. | श्रीमती माधुरी बिडवई | म.न.पा. शाळा वसंतभवन |
| 22. | श्रीमती संध्या सखाराम मैंद | म.न.पा.शाळा जुनाबाजार |
| 23. | श्रीमती दया वसंतराव पांगरकर | म.न.पा.शाळा जुनाबाजार |
| 24. | श्रीमती फरजाना बेगम शेख बशीर | म.न.पा.शाळा जुनाबाजार |
| 25. | श्रीमती संगिता देवराव जगताप | म.न.पा.शाळा पोलीस हेडक्वार्ट |
| 26. | श्रीमती निलीमा कुलकर्णी | म.न.पा.शाळा हेडक्वार्टर |
| 27. | श्रीमती शिला सुधाकर काळे | म.न.पा.शाळा गरमपाणी स्वतंत्र |
| 28. | श्रीमती महेरुन्निसा बेगम | म.न.पा.के.प्रा.शाळा किराडपुरा नं. 1 (उर्दु) |
| 29. | श्रीमती आसिया बेगम/नुसरत बेगम | म.न.पा.के.प्रा.शाळा किराडपुरा नं. 1 (उर्दु) |
| 30. | श्रीमती सफिया बानो अब्बास | म.न.पा.के.प्रा.शाळा किराडपुरा नं. 1 (उर्दु) |
| 31. | श्रीमती रुबिना बेगम न. सिद्दीकी | म.न.पा.के.प्रा.शाळा किराडपुरा नं. 2 (उर्दु) |
| 32. | श्रीमती एकबाल सिमी अ. कादर | म.न.पा.के.प्रा.शाळा किराडपुरा नं. 2 (उर्दु) |
| 33. | श्रीमती सुनिता शेजवळ | म.न.पा.के.प्रा.शाळा किराडपुरा नं. 3 (म.) |
| 34. | श्रीमती अफरोज जहॉ | म.न.पा.के.प्रा.शाळा किराडपुरा नं. 3 (उर्दु) |
| 35. | श्रीमती पुष्पा पंडीत गायकवाड | म.न.पा.शाळा यशोधरा कॉलनी (म.) |
| 36. | श्रीमती छाया प्रल्हाद राऊत | म.न.पा.शाळा यशोधरा कॉलनी (म.) |
| 37. | श्रीमती संगिता बोरसे | म.न.पा.शाळा यशोधरा कॉलनी (म.) |
| 38. | श्रीमती सिमा यास्मीन शेख उस्मान | म.न.पा.शाळा यशोधरा कॉलनी (उर्दु) |
| 39. | श्रीमती काझी समिना परवीन | म.न.पा.शाळा यशोधरा कॉलनी (उर्दु) |

| | | |
|---|---|---|
| 40. | श्रीमती बशीर फातेमा | म.न.पा.शाळा यशोधरा कॉलनी (उर्दु) |
| 41. | श्रीमती फरिदा बेगम स. मुस्तफा | म.न.पा.शाळा मुजफ्फरनगर (उर्दु) |
| 42. | श्रीमती सय्यद कैसर बेगम अ. अली | म.न.पा.शाळा चेलीपुरा (उर्दु) |
| 43. | श्रीमती नाजेमा सिद्दीकी शेख जमील | म.न.पा.शाळा शाहाबाजार (उर्दु) |
| 44. | श्रीमती सुरेय्या बानो सय्यद उस्मान | हत्तेसिंगपुरा , नेहरुनगर, किराडपुरा (उर्दु) |
| 45. | श्रीमती स्वाती बिडवई | म.न.पा.शाळा सिडको एन-6 |
| 46. | श्रीमती अनुराधा ठोंबरे | आंबेडकरनगर (फुलेनगर) |
| 47. | श्रीमती सुवर्णा विधोतेकर | म.न.पा. शाळा सिडको एन-11 |
| 48. | श्रीमती मंजुषा पोतदार | म.न.पा. सिडको एन-9 |
| 49. | श्रीमती साधना गवळी | म.न.पा.शाळा सेंट्रल जेल |
| 50. | श्रीमती अंजली नंदकिशोर कुलकर्णी | म.न.पा.शाळा सिडको एन -12 |
| 51. | श्रीमती छाया बकले | म.न.पा.शाळा हर्सुल वसाहत |
| 52. | श्रीमती पुर्णाबाई हरणे | म.न.पा.शाळा फुलेनगर हर्सुल |
| 53. | श्रीमती सुर्यकला पचलोरे | म.न.पा.शाळा हर्सुल वसाहत |
| 54. | श्रीमती चंद्रकला बकले | म.न.पा.शाळा हर्सुल (मराठी) |
| 55. | श्रीमती रमा दुबे | म.न.पा.शाळा हर्सुल (मराठी) |
| 56. | श्रीमती जुफीशान जझा हकीम फैज क. | म.न.पा.शाळा हर्सुल (उर्दु) |
| 57. | श्रीमती वंदना महाजन | आंबेडकरनगर (गौतमनगर) |
| 58. | श्रीमती संगिता पंडीत | आंबेडकरनगर (गौतमनगर) |
| 59. | श्रीमती प्रतिभा जाधव | आंबेडकरनगर (फुलेनगर) |
| 60. | श्रीमती सुरेखा कुलकर्णी | आंबेडकरनगर |
| 61. | श्रीमती पद्मा पंडीत | आंबेडकरनगर |
| 62. | श्रीमती सुनंदा सदावर्ते | आंबेडकरनगर |
| 63. | श्रीमती महानंद श्रीरंग काळे | हर्सुल (फुलेनगर) |
| 64. | श्रीमती धना सर्जेराव पवार | म.न.पा.शाळा सिध्दार्थनगर एन-12 |
| 65. | श्रीमती अनिता जनार्धन चुंचेकर | म.न.पा.शाळा रोजबाग (प्रकल्प) |
| 66. | श्रीमती हाश्मी तहुरा सय्यद मसुद | म.न.पा.शाळा रोजेबाग (उर्दु) |
| 67. | श्रीमती अनिता सुधाकर दुसाने | म.न.पा.शाळा शताब्दीनगर |
| 68. | श्रीमती सुशिला शेळके | म.न.पा.शाळा शताब्दीनगर |
| 69. | श्रीमती अजरा फातेमा | म.न.पा.शाळा शताब्दीनगर |
| 70. | श्रीमती शहाना बेगम रहेमान अ. खान | म.न.पा.शाळा गणेश कॉलनी (उर्दु) |
| 71. | श्रीमती रत्नप्रभा पंडीतराव खैरनार | म.न.पा.शाळा नारेगांव |
| 72. | श्रीमती कौसर परवीन बशीरुद्दीन | म.न.पा.शाळा नारेगांव (उर्दु) |
| 73. | श्रीमती सुरेखा मोतीलाल परभणकर | म.न.पा.शाळा नारेगांव (प्रकल्प) |
| 74. | श्रीमती सुरेखा काळे | म.न.पा.शाळा गितानगर |
| 75. | श्रीमती स्वाती भास्करराव गौड | म.न.पा.शाळा मिसारवाडी |
| 76. | श्रीमती मंगला काळे | म.न.पा.शाळा मिसारवाडी |
| 77. | श्रीमती वंदना साळुबा सुरडकर | म.न.पा.शाळा मिसारवाडी |
| 78. | श्रीमती रेहाना शेख शहानुर | म.न.पा.के.प्रा.शाळा मुकूंदवाडी |
| 79. | श्रीमती संगिता शिलवंत | म.न.पा.के.प्रा.शाळा मुकूंदवाडी |
| 80. | श्रीमती मंदा मिसाळ | म.न.पा.के.प्रा.शाळा मुकूंदवाडी |
| 81. | श्रीमती आशा शेगांवकर | म.न.पा.शाळा संजयनगर (प्रकल्प) |
| 82. | श्रीमती मंगला नाडे | म.न.पा.शाळा संजयनगर (प्रकल्प) |
| 83. | श्रीमती शकुंतला पिंगळे | म.न.पा.शाळा विठ्ठलनगर |

| | | |
|---|---|---|
| 84. | श्रीमती सविता वाणी | म.न.पा.शाळा चिकलठाणा |
| 85. | श्रीमती नलीनी पाटील | म.न.पा.शाळा चिकलठाणा |
| 86. | श्रीमती कामीनी घोरपडे | म.न.पा.शाळा जयभवानीनगर |
| 87. | श्रीमती सुजाता मान्टे | म.न.पा.शाळा हनुमाननगर |
| 88. | श्रीमती दुर्गा वि. खराटे | म.न.पा.शाळा भारतनगर नं. 1 |
| 89. | श्रीमती सविता त्रं. शिरसाळे | म.न.पा.शाळा विश्रांतीनगर |
| 90. | श्रीमती निलीमा कवठेकर | म.न.पा.शाळा विश्रांतीनगर |
| 91. | श्रीमती मिना देशमुख | म.न.पा.शाळा विश्रांतीनगर |
| 92. | श्रीमती माधुरी देशमुख | म.न.पा.शाळा भारतनंगर नं. 2 |
| 93. | श्रीमती मिरा मोरे | म.न.पा.के.प्रा.शाळा प्रियदर्शनी इंदिरानगर |
| 94. | श्रीमती रेखा विश्वनाथ धोटे | म.न.पा.शाळा प्रियदर्शनी इंदिरानगर नं. 1 |
| 95. | श्रीमती शिला विश्वनाथ मनगटे | म.न.पा.शाळा प्रियदर्शनी इंदिरानगर नं. 2 |
| 96. | श्रीमती समिना तडवी | म.न.पा.के.प्रा.शाळा प्रियदर्शनी इंदिरानगर उर्दु |
| 97. | श्रीमती आशा केनेकर | म.न.पा.शाळा जवाहर कॉलनी |
| 98. | श्रीमती आशा घायतिलक | म.न.पा.शाळा गारखेडा |
| 99. | श्रीमती प्रमिला केशवराव तायडे | म.न.पा.शाळा विष्णुनगर |
| 100. | श्रीमती प्रतिभा विठ्ठलराव मान्टे | म.न.पा.शाळा विश्रांतीनगर |
| 101. | श्रीमती अरुणा नाईक | म.न.पा.शाळा शहानुरवाडी |
| 102. | श्रीमती संगिता सोनवणे | म.न.पा.शाळा एकनाथनगर |
| 103. | श्रीमती अस्मा परवीन | म.न.पा.शाळा उस्मानपुरा (मुलींची) |
| 104. | श्रीमती शालु बाबुराव कांबळे | म.न.पा.शाळा बन्सीलालनगर |
| 105. | श्रीमती उज्वला किसन बन्सीले | म.न.पा.शाळा पद्मपुरा |
| 106. | श्रीमती मोबीना आफरीन सरवर हयात खान | म.न.पा.शाळा शहाबाजार |
| 107. | श्रीमती मनिषा चांदेकर | म.न.पा. विश्रांतीनगर |
| 108. | श्रीमती विजया जर्नाधन पंडीत | म.न.पा.शाळा बनेवाडी |
| 109. | श्रीमती इंद्रकन्या रंगनाथ निकम | म.न.पा.शाळा बनेवाडी |
| 110. | श्रीमती कल्पना मोहनलाल गहिरे | म.न.पा.शाळा राहुलनगर (प्रकल्प) |
| 111. | श्रीमती गायकवाड कविता रघुनाथ | म.न.पा.शाळा विटखेडा |
| 112. | श्रीमती संगिता बाळु मैंद | म.न.पा.शाळा कांचनवाडी |
| 113. | श्रीमती निर्मला सदाशिव ताबगाडे | म.न.पा.शाळा नक्षत्रवाडी |
| 114. | श्रीमती लता कडुबा जाधव | म.न.पा.शाळा वाल्मी |
| 115. | श्रीमती छाया चापोलीकर | म.न.पा.के.प्रा. शाळा कैलासनगर |
| 116. | श्रीमती ज्योती परवत | म.न.पा.के.प्रा. शाळा इंदिरानगर बायजीपुरा |
| 117. | श्रीमती कमल सोनवणे | म.न.पा.के.प्रा. शाळा इंदिरानगर बायजीपुरा |
| 118. | श्रीमती विमल काथार | म.न.पा.शाळा जिन्सी/रेंगटीपूरा (म) |
| 119. | श्रीमती नाजीया नसरीन | म.न.पा.शाळा जिन्सी/रेंगटीपूरा (उर्दु) |
| 120. | श्रीमती लक्ष्मी छगन बुरकूले | म.न.पा.शाळा रोहिदासपुरा |
| 121. | श्रीमती संगिता शुक्ला | म.न.पा.शाळा कैलासनगर |
| 122. | श्रीमती स्मिता पुरी | म.न.पा.शाळा कैलासनगर |
| 123. | श्रीमती सुनिता कोल्हे | म.न.पा.शाळा कैलासनगर |
| 124. | श्रीमती मंगला वाहुळ | म.न.पा.शाळा खोकडपुरा |
| 125. | श्रीमती कुसूम रमेश जाधव | म.न.पा.शाळा खोकडपुरा |
| 126. | श्रीमती शबाना शेख बाबर | म.न.पा.शाळा पैठणगेट (उर्दु) |
| 127. | श्रीमती संध्या दिक्षीत | म.न.पा.शाळा नुतन कॉलनी |

| | | |
|---|---|---|
| 128. | श्रीमती पुष्पा दाभाडे | म.न.पा.शाळा नारेगांव |
| 129. | श्रीमती विद्या कानडे | म.न.पा.शाळा संजयनगर |
| 130. | श्रीमती छाया वानखेडे | म.न.पा.शाळा रमानगर |
| 131. | श्रीमती सपना सुनिल निबाळकर | म.न.पा.शाळा अशोकनगर |
| 132. | श्रीमती ज्योती संपतराव जाधव | म.न.पा.शाळा अशोकनगर |
| 133. | श्रीमती माधुरी व्यकंटेश ताजने | म.न.पा.शाळा अशोकनगर |
| 134. | श्रीमती सुरेखा भिमसेन दाभाडे | म.न.पा.शाळा नारेगांव |
| 135. | श्रीमती अनिता शिवाजी साळवे | म.न.पा. शाळा ब्रिजवाडी |
| **बालवाडी सेविकाचे नाव** | | |
| 1 | श्रीमती बुगनाबी सय्यद युसूफ | म.न.पा.शाळा एकनाथनगर |
| 2 | श्रीमती शोभा तुळशीराम प्रधान | म.न.पा.शाळा संजयनगर (म.) |
| 3 | श्रीमती अंबिका तुकाराम गायकवाड | म.न.पा.शाळा संजयनगर (म.) |
| 4 | श्रीमती जनाबाई भिवसन शेजुळ | म.न.पा.शाळा सिल्लेखाना |
| 5 | श्रीमती कुसूम अशोक अमृतफळे | फंक्शन हॉल किराडपुरा |
| 6 | श्रीमती परीगाबाई दाभाडे | म.न.पा.शाळा बडीगिरणी |
| 7 | श्रीमती अनिसा बेगम अजगर खाँ | म.न.पा.शाळा रोजेबाग (प्रकल्प) |
| 8 | श्रीमती मिनाबाई बालकिशन पठाडियाँ | म.न.पा.शाळा प्रियदर्शनी इंदिरानगर नं.2 |
| 9 | श्रीमती संगिता कर्नल | म.न.पा.शाळा संजयनगर (जिन्सी) |
| 10 | श्रीमती लक्ष्मी सत्यविजय काळे | आंबेडकरनगर (फुलेनगर सिडको एन-7) |
| 11 | श्रीमती बेबी मदनलाल बांगरे | म.न.पा.शाळा नारेगांव |
| 12 | श्रीमती बबीता इंगळे | म.न.पा.शाळा मुलींची उस्मानपुरा |
| 13 | श्रीमती कल्याणी सुनिल गायकवाड | म.न.पा.शाळा शहानुरवाडी |
| 14 | श्रीमती वनमाला कचरु वाघमारे | फुलेनगर उस्मानपुरा वाचनालय |

श्रीमती वनमाला कचरु वाघमारे यांची जा.क्र.मनपा/आस्था-2/837, दिनांक 20.7.2016 अन्वये दैनिक वेतन कर्मचारी म्हणुन नियुक्ती करण्यात आली आहे करिता संबंधिताची मुदतवाढ ही दि.15.06.2016 ते 19.07.2016 पर्यंतच असेल. तसेच श्रीमती वनमाला कचरू वाघमारे, बालवाडी सेविका या वाचनालयात कार्यरत असल्याने त्यांना दि.02.05.2016 ते दि.14.06.2016 पर्यंत जा.क्र. मनपा/शिक्षण/2016/398, दिनांक 15.07.2016 नुसार मा.आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद यांच्या मान्यतेने मा.स्थायी समितीच्या कार्योत्तर मान्यतेच्या अधिन राहुन मुदवाढ देण्यात आली होती. सदर मुदतवाढ कार्योत्तर मंजुरीस्तव सादर.

वरीलप्रमाणे सन 2016-17 च्या शैक्षणिक वर्षातील प्रथम सत्रात उपरोक्त 135 बालवाडी शिक्षिका व 14 बालवाडी सेविका यांना दिनांक 15.06.2016 ते दिवाळीच्या सुटया लागेपर्यंत दिनांक 27.10.2016 पर्यंतची मुदतवाढ देण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

मा.सभापती : विषय मंजूर करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शिक्षण विभागात कार्यरत असलेल्या एकूण 138 बालवाडी शिक्षका व 14 बालवाडी सेविका यांना जा.क्र.मनपा/शिक्षण/2016/15, दि.06/01/2016 रोजीच्या आदेशान्वये दिनांक 26/11/2015 ते दिनांक 30/04/2016 (उन्हाळयाच्या सुटया लागेपर्यंत) पर्यंत तात्पुरती नियुक्ती/मुदतवाढ देण्यात आलेली असून सद्यस्थितीत 138 पैकी 135 बालवाडी शिक्षिका या चालु शैक्षणिक वर्षात शाळेत दिनांक 15/06/2016 पासुन कार्यरत असल्यामुळे, सदर बालवाडी शिक्षिका यांचे दरमहा मानधन रु.5000/- व बालवाडी सेविका यांचे मानधन दरमहा रु.2000/- आहे. तसेच श्रीमती वनमाला कचरु वाघमारे यांची जा.क्र.मनपा/आस्था-2/837, दिनांक 20.7.2016 अन्वये दैनिक वेतन कर्मचारी

म्हणुन नियुक्ती करण्यात आली आहे करिता संबंधिताची मुदतवाढ ही दि.15.06.2016 ते 19.07.2016 पर्यंतच असेल, तसेच श्रीमती वनमाला कचरू वाघमारे, बालवाडी सेविका या वाचनालयात कार्यरत असल्याने त्यांना दि.02.05.2016 ते दि.14.06.2016 पर्यंत जा.क्र. मनपा/शिक्षण/2016/398, दिनांक 15.07.2016 नुसार मा.आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद यांच्या मान्यतेने मा.स्थायी समितीच्या कार्योत्तर मान्यतेच्या अधिन राहुन मुदवाढ देण्यात आली होती, सदर मुदतवाढीस कार्योत्तर मंजुरी देण्यांत येते. करीता वरीलप्रमाणे सन 2016-17 च्या शैक्षणिक वर्षातील प्रथम सत्रात उपरोक्त 135 बालवाडी शिक्षिका व 14 बालवाडी सेविका यांना दिनांक 15.06.2016 ते दिवाळीच्या सुटया लागेपर्यंत दिनांक 27.10.2016 पर्यंतची मुदतवाढ देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 28 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, शिक्षण विभागात कार्यरत असलेल्या रितसर प्रक्रियेने भरती केलेल्या तासिकातत्वावरील माध्यमिक शिक्षिकांची मुदत जा.क्र.मनपा/शिक्षण/2016/02, दि.01/01/2016 रोजीच्या आदेशान्वये दिनांक 26/11/2015 ते (उन्हाळयाच्या सुट्टया लागेपर्यंत) दिनांक 30/04/2016 पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे. सद्यस्थीतीत खालील रितसर प्रक्रियेने भरती केलेले तासिका तत्वावरील माध्यमिक शिक्षक कार्यरत आहेत.

| अ. क्र. | शाळेचे नाव | तासिका तत्वावरील शिक्षकांचे नाव | शैक्षणिक पात्रता | अध्यापनाचे विषय | एक महिन्याच्या कमाल 72 तास | प्रतितास मानधन रु. 90/- |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | मा.वि. बेगमपुरा | श्री.तेहरीम शे.बाबर | बी.एस्सी. बी.एड. | गणित | 72 तास | रु.90/- |
| 2 | मा.वि. बेगमपुरा | श्री.संघवी रविंद्रकुमार जिनदास | बी.एस्सी. बी.एड. | विज्ञान | 72 तास | रु.90/- |
| 3 | मा.वि. मिटमिटा | श्री.म्हेत्रे निलेश मधुकर | बी.ए. बी.एड. | इंग्रजी | 72 तास | रु.90/- |
| 4 | मा.वि. हर्सुल (म.) | श्री.हिरेकर सुनिल दौलतराव | बी.एस्सी. बी.एड. | गणित | 72 तास | रु.90/- |
| 5 | मा.वि.किराडपुरा नं.1 | श्रीमती शेख मावीया तबस्सुम शे.नजमुद्दिन | बी.एस्सी. बी.एड. | गणित | 72 तास | रु.90/- |
| 6 | मा.वि.किराडपुरा नं.1 | श्रीमती सय्यदा शाहीन अंजुम तौफिक अली | बी.ए. बी.एड. | इतिहास (सा.शास्त्रे) | 72 तास | रु.90/- |
| 7 | मा.वि. हर्सुल (म.) | श्रीमती पवार किरण भारत | बी.एस्सी. बी.एड. | विज्ञान | 72 तास | रु.90/- |
| 8 | मा.वि. सिडको एन-7 | श्रीमती राठोड मंजुश्री गणपतराव | बी.एस्सी. बी.एड. | गणित | 72 तास | रु.90/- |
| 9 | मा.वि. सिडको एन-7 | श्रीमती देशमुख वैशाली दिनकर | बी.एस्सी. बी.एड. | विज्ञान | 72 तास | रु.90/- |
| 10 | मा.वि. सिडको एन-7 | श्री.उमेश अशोक गायकवाड | बी.ए. बी.एड. | मराठी | 72 तास | रु.90/- |
| 11 | मा.वि.नारेगांव | श्रीमती पाटील वैशाली कैलास | बी.ए. बी.एड. | मराठी | 72 तास | रु.90/- |
| 12 | के.प्रा.शा. बेगमपुरा | श्री.पठाण जावेद खान साहेब खान | बी.ए. बी.एड. | हिन्दी | 72 तास | रु.90/- |
| 13 | मा.वि.मुकूंदवाडी | श्रीमती ढोबळे राखी राम | बी.एस्सी. बी.एड. | गणित | 72 तास | रु.90/- |
| 14 | मा.वि.मुकूंदवाडी | श्रीमती मनिषा बळीराम शिंदे | बी.एस्सी. बी.एड. | विज्ञान | 72 तास | रु.90/- |
| 15 | मा.वि.प्रियदर्शनीइंदिरानगर | श्रीमती कुऱ्हाडे सुमन संतोष | बी.एस्सी. बी.एड. | गणित | 72 तास | रु.90/- |
| 16 | मा.वि.प्रियदर्शनीइंदिरानगर | श्रीमती चौधरी संगीता लक्ष्मण | बी.एस्सी. बी.एड. | विज्ञान | 72 तास | रु.90/- |
| 17 | मा.वि. बन्सीलालनगर | श्री.काकडे राहिदास समुरलीधर | बी.एस्सी. बी.एड. | गणित | 72 तास | रु.90/- |
| 18 | मा.वि. बनेवाडी | श्री.उन्हाळे प्रकाश भगवान | बी.ए. बी.एड. | इंग्रजी | 72 तास | रु.90/- |
| 19 | मा.वि. मिटमिटा | श्री.नन्नवरे श्रीकांत सोमकांत | बी.एस्सी. बी.एड. | गणित | 72 तास | रु.90/- |
| 20 | मा.वि. बनेवाडी | श्री.भुतेकर भाग्येश्वर श्रीकिशन | बी.ए. बी.एड. | मराठी | 72 तास | रु.90/- |
| 21 | मा.वि. इंदिरानगर बायजीपुरा | श्रीमती वामन सरीता रामकृष्ण | बी.ए. बी.एड. | इंग्रजी | 72 तास | रु.90/- |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 22 | मा.वि. इंदिरानगर बायजीपुरा | श्रीमती जंजाळ उज्वला परसराम | बी.एस्सी. बी.एड. | विज्ञान | 72 तास | रु.90/- |
| 23 | मा.वि. इंदिरानगर बायजीपुरा | श्रीमती रेखा दशरथ महाजन | बी.एस्सी. बी.एड. | गणित | 72 तास | रु.90/- |

वरीलप्रमाणे कमाल तासांची मर्यादा ठरवुन दिलेली आहे.त्यापेक्षा कोणत्याही तासिका तत्वावरील माध्यमिक शिक्षकांचे जास्तीचे मानधन अदा केले जाणार नाही याची जबाबदारी संबंधित मुख्याध्यापकांची राहिल. याशिवाय शिक्षिकांनी काही अतिरिक्त तास घेतल्यास त्याची स्वंतत्र नोंद मुख्याध्यापक हे ठेवतील व तशी मान्यता घेतल्यानंतरच मानधन अदा करण्यात येईल.

वरील कर्मचाऱ्यांना सन 2016-2017 च्या शैक्षणिक वर्षांतील प्रथम सत्रात दिनांक 15/06/2016 ते (दिवाळीच्या सुट्टया लागेपर्यंत) दिनांक 27/10/2016 पर्यंतची मुदतवाढ देण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

मा.सभापती : विषय मंजूर करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शिक्षण विभागात कार्यरत असलेल्या रितसर प्रक्रियेने भरती केलेल्या तासिका तत्वावरील माध्यमिक शिक्षिकांची मुदत जा.क्र.मनपा/शिक्षण/2016/02, दि.01/01/2016 रोजीच्या आदेशान्वये दिनांक 26/11/2015 ते (उन्हाळयाच्या सुट्टया लागेपर्यंत) दिनांक 30/04/2016 पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली असल्याने व सद्यस्थीतीत रितसर प्रक्रियेने भरती केलेले तासिका तत्वावरील माध्यमिक शिक्षक (अ.क्र.01 ते 23) प्रमाणे कार्यरत असल्याने त्यांना वरीलप्रमाणे कमाल तासांची मर्यादा ठरवुन दिल्यानुसार त्यापेक्षा कोणत्याही तासिका तत्वावरील माध्यमिक शिक्षकांचे जास्तीचे मानधन अदा केले जाणार नाही, याची जबाबदारी संबंधित मुख्याध्यापकांची राहिल, याशिवाय शिक्षिकांनी काही अतिरिक्त तास घेतल्यास त्याची स्वंतत्र नोंद मुख्याध्यापक यांनी ठेवावी व तशी मान्यता घेतल्यानंतरच मानधन अदा करण्यात येईल. करीता वरील कर्मचाऱ्यांना सन 2016-2017 च्या शैक्षणिक वर्षांतील प्रथम सत्रात दिनांक 15/06/2016 ते (दिवाळीच्या सुट्टया लागेपर्यंत) दिनांक 27/10/2016 पर्यंतची मुदतवाढ देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 29 :**

आरोग्य वैद्यकीय अधिकारी, महानरपालिका, औरंगाबाद प्रस्ताव सादर करत आहेत की, औरंगाबाद महानगरपालिकेच्या हद्दीत प्रजनन व बाल आरोग्य सेवा टप्पा-2 राबविण्यासाठी मा.सर्वसाधारण सभा दिनांक 11.1.2007 विषय क्रं.655/4 नुसार मंजुरी देण्यात आलेली आहे. सदरील काय्रक्रम 2007 ते 2012 या कालावधीकरिता होता. प्रकल्पाचा कालावधी संपल्यानंतर मनपातर्फे प्रकल्पाचा भार सोसण्यास व कार्यक्रम नियमित स्वरुपात राबविण्यास मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेनुसार मंजूरी देण्यात आलेली आहे. मा.अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा, पुणे यांचे पत्र जा.क्रं.राकुकका/अर्बनआरसीएच/कक्ष-17/20172-44/07 दिनांक 26.3.2007 प्रकल्प राबविण्यासाठी मंजुरी देण्यात आलेली आहे.

वाढती लोकसंख्या, मातामृत्यू व बालमृत्यु एकूण प्रजनन दर कमी करणे हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश आहे. याचप्रमाणे गरोदर माता, बालके, किशोरवयीन मुले व मुली यांच्याकरिता विविध आरोग्य सेवा सुविधा देण्यासाठी निरनिराळे आरोग्य विषयक कार्यक्रम राबविले जातात. मा.सर्वसाधारण सभा दिनांक 20/04/2016 विषय क्रमांक 379 अन्वये आरसीएच-2 अंतर्गत कार्यरत एकूण 28 वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी यांना दिनांक 3.2.2016 ते 31.7.2016 या कालावधीकरिता मुदतवाढ देण्यात आलेली आहे. सदरील मुदतवाढ दिनांक 31.7.2016 रोजी संपुष्टात येत आहे. खालील सर्व पदे नियमित स्वरुपात न ठेवल्यास आरोग्य सेवा विस्कळीत होईल. यामुळे सर्व पदांची आवश्यकता आहे. सध्या कार्यरत अधिकारी व कर्मचारी यांना देण्यात येणाऱ्या ठराविक वेतनाचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्रं. | नांव | पदनाम | ठराविक वेतन |
|---|---|---|---|
| 01 | डॉ.वैशाली मुदगडकर | महिला वैद्यकीय अधिकारी | रु.18000/- |
| 02 | डॉ.ऋता प्रकाश आनंदगांवकर | महिला वैद्यकीय अधिकारी | रु.18000/- |
| 03 | श्रीमती जया उघडे | स्टाफ नर्स | रु.9000/- |
| 04 | श्रीमती सुनिता गणपत नरवडे | स्टाफ नर्स | रु.9000/- |
| 05 | श्रीमती विद्या राजू शर्मा | स्टाफ नर्स | रु.9000/- |
| 06 | श्रीमती ज्योती रामचंद्र बनकर | स्टाफ नर्स | रु.9000/- |
| 07 | श्रीमती मेरी पाखरे | स्टाफ नर्स | रु.9000/- |
| 08 | श्रीमती ज्योती चव्हाण | एएनएम | रु.7500/- |
| 09 | श्रीमती द्रौपदी डक | एएनएम | रु.7500/- |
| 10 | श्रीमती लक्ष्मी पाटील | एएनएम | रु.7500/- |
| 11 | श्रीमती मिनाक्षी डोंगरे | एएनएम | रु.7500/- |
| 12 | श्रीमती रेखा नायमाने | एएनएम | रु.7500/- |
| 13 | श्रीमती शिला राठोड | एएनएम | रु.7500/- |
| 14 | श्रीमती सोनाली पावलस भिसे | एएनएम | रु.7500/- |
| 15 | श्रीमती वर्षा जाधव | एएनएम | रु.7500/- |
| 16 | श्रीमती वर्षा महादू सोनवणे | एएनएम | रु.7500/- |
| 17 | श्रीमती सुनंदा नामदेव चव्हाण | एएनएम | रु.7500/- |
| 18 | श्रीमती सारिका मनोहर इंगळे | एएनएम | रु.7500/- |
| 19 | श्रीमती कविता चव्हाण | एएनएम | रु.7500/- |
| 20 | श्रीमती वैशाली चिंतामण बिऱ्हारे | एएनएम | रु.7500/- |
| 21 | श्रीमती सिमा अरुण गुरव | एएनएम | रु.7500/- |
| 22 | श्रीमती समिनाबेगम शेख सलीम | एएनएम | रु.7500/- |
| 23 | श्रीमती वर्षा हरिभाऊ फुले | एएनएम | रु.7500/- |
| 24 | श्रीमती आरती एकनाथ वाघमारे | एएनएम | रु.7500/- |
| 25 | श्रीमती अश्विनी रमेशराव परळकर | एएनएम | रु.7500/- |
| 26 | श्रीमती प्रिंयका चंद्रकांत मगरे | एएनएम | रु.7500/- |
| 27 | श्रीमती अग्नेस जे.मकासरे | एएनएम | रु.7500/- |

श्रीमती स्वाती जिरीमाळी यांनी एनएचएम अंतर्गत स्टाफ नर्स म्हणून नियुक्ती मिळालेली आहे. त्यामुळे पदाचा राजीनामा दिलेला आहे. यामुळे सध्या कार्यरत 2 वैद्यकीय अधिकारी व 25 कर्मचारी यांना वेतनाकरिता रु.231000/- व वार्षिक खर्च रु.27,72,000/-अपेक्षित आहे. सदरील अधिकारी व कर्मचारी यांच्या वेतनावरील खर्च मनपा अर्थसंकल्प माता व बाल संगोपन (आरसीएच) या घटकामध्ये करण्यात आलेली आहे. आरसीएच-2 अंतर्गत सध्या कार्यरत 2 अधिकारी व 25 कर्मचारी यांना प्रस्तावित केल्यानुसार 2 दिवसांचा तांत्रिक खंड देऊन म्हणजे दिनांक 3.8.2016 ते 31.1.2017 या कालावधीकरिता मुदतवाढ देण्यास व वेतनावरील खर्च मनपा फंडातून देण्यास प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेपुढे मान्यतेस्तव व मंजुरीस्तव सादर.

मा.सभापती : विषय मंजूर करण्यांत येतो.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद महानगरपालिकेच्या हद्दीत प्रजनन व बाल आरोग्य सेवा टप्पा-2 राबविण्यासाठी आरसीएच-2 अंतर्गत कार्यरत अ.क्र.01 ते 27 एकूण 27 वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी यांना 2 दिवसांचा तांत्रिक खंड देऊन दिनांक 3.8.2016 ते 31.1.2017 या कालावधीकरिता मुदतवाढ

देण्यास व वेतनाकरिता येणाऱ्या मासिक र.रु.2,31,000/- व वार्षिक रु.27,72,000/- च्या अपेक्षित खर्चास मंजुरी देण्यांत येते तसेच वेतनावरील खर्च मनपा फंडातून देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**चर्चा :**

श्री.कैलास गायकवाड : 1076 कोटीचे बजेट केले सभेने मान्यता दिली.शहरात अनेक भागात खड्डे झाले बुजविले जात नाही. मालमत्ता करापोटी 290 कोटी थकलेले आहे एलबीटीसाठी 300 कोटीचे उद्दिष्ट दिले 50 कोटी पेक्षा जास्त उलाढाल करणारे ग्राहक असतील त्यांचेकडून एलबीटीची किती उत्पन्न आले मार्च ते ऑगस्ट 2016 पर्यत किती वसुली आलेली आहे.

श्रीमती मनिषा मुंडे : हे शहर ऐतिहासीक,अनेक रस्त्यात खड्डे पडले.नागरीक मुरूम टाकून खड्डे बुजवित आहे शरमेची बाब आहे. वार्डातील कामे होणार की नाही.
(यावेळी काही अधिकारी उपस्थित नसतात.)

मा.सभापती : महापालिकेस येणारे उत्पन्न आतापर्यत किती आले माहिती दयावी यापुर्वीही अधिकारी उपस्थित नव्हते प्रशासनाने काय ॲक्शन घेतली.

उपआयुक्त(आस्थापना) : अग्निशमन अधिकारी अनुपस्थित होते त्यांना नोटीस देऊन सभेला उपस्थित राहण्या बाबत ताकीद दिली आहे.

कर निर्धा.संकलक (श्री.निकम): मालमत्ता कराची एप्रिल ते आजपर्यत 34 कोटी वसुल झालेले आहे

श्री.कैलास गायकवाड : सहा महिण्याचा कालावधी गेला 25 टक्के सुध्दा वसुली नाही जास्तीत जास्त वसुलीसाठी प्रशासनाचे काय नियोजन आहे.एलबीटीची वसुली किती आलेली आहे.

श्री.राजगौरव वानखेडे : एक वर्षामध्ये वसुली विभागासाठी अनेकदा अधिकारी बदलले त्यामूळे वसुली होत नाही किती अधिकारी यांची नियुक्ती केली आहे.

कक्ष प्रमुख-एलबीटी : एलबीटी पोटी शासनाकडून दरमहा 13.80 कोटी आले.रजिस्ट्री कार्यालयाकडून 1.25 कोटी तसेच जे आस्थापना आहे त्याकडून 3.25 कोटी महिण्याला असे एकूण 73.73 कोटी आलेले आहे.

श्री.कैलास गायकवाड : पाणीपट्टी, नगररचना विभागाची किती वसुली झाली खुलासा करावा.

उपअभियंतां(श्री.चाहेल) : पाणीपट्टीची वसुली बाबत लेखा विभागाकडून माहिती घेणे योग्य आहे.

मुख्यलेखाधिकारी : कन्सेशन ॲग्रीमेंन्टनुसार समांतर एजन्सीचे कर्मचारी वसुली करीत आहे. इनडिफेन्डट इंजिनिअर व मनपाचा हिस्सा पोटी जमा होणारी रक्कम यावर कार्य.अभियंता यांचे नियत्रंण आहे जुलै अखेर 26 कोटी जमा झाले.

श्रीमती मनीषा मुंडे : एक वर्षापासून माझ्या वार्डात घाण पाणी येते कुणीही दखल घेत नाही.अधिकारी कामे ऐकत नाही (या वेळी घाण पाण्याची बॉटल दाखवतात व मा.सभापती यांचे डायस समोर खाली बसतात)

श्री.कैलास गायकवाड : अनेकदा सदस्यांनी प्रश्न मांडला सुचना केली प्रशासन दखल घेत नाही.

श्रीमती संगिता वाघुले : माझ्या वार्डातही पिण्याच्या पाण्यात घाण पाणी येते. सुचना करूनही दखल घेत नाही.

मा.सभापती : संबधीत अधिकारी यांनी खुलासा करावा.अशा प्रकरणात कामे का होत नाही.

उपअभियंता(श्री.चहल) : समांतर एजन्सीला कामे करण्या संबधी पत्र दिले जर कंपनी काम करीत नसेल तर महापालिका काम करील व झालेला खर्च वसुल करण्यात येईल असेही कळविले आहे.तक्रारी आल्या त्यानुसार कळविले आहे.आता प्रत्येक झोन वाईज 25 लक्षचे टेंडर काढून कामे करण्या बाबत कार्यवाही होत आहे.ज्या घाण पाण्याविषयी तक्रारी आहेत लगेच वेल्डर पाठवून दुरूस्ती केली जाईल.

मा.सभापती : तातडीने पाण्याच्या लाईनच्या बाबतीत ज्या समस्या असतील त्या सोडवाव्यात.

शहर अभियंता : घाण पाण्याचे प्रॉब्लेम पावसाळयात जास्त येत असतात कारणे वेगवेगळी असेल कंपनीला टर्मीनेट करण्याची कार्यवाही चालू आहे कोर्ट प्रकरण आहे कंपनी बाबत जो निर्णय घेतला तेंव्हा पासून कंपनी काम करण्यास हयगय करीत आहे कामे होत नाही व तक्रारी येत आहे त्यामूळे प्रत्येक झोन वाईज 1 कोटीचे टेंडर काढून एजन्सी फिक्स करून अशा प्रकारची तातडीचे कामे केली जातील व होणारा खर्च एजन्सीकडून वसुल केले जाईल स.सदस्या श्रीमती मुंढे यांचे वार्डात अनेक लोकांनी अनधिकृत नळ कनेक्शन घेतले ते घेतांना खड्डे खोदलेले आहे त्यात पाणी येते व तेच पाणी लाईनमध्ये जाऊन घाण पाणी येत असेल उदयाच तेथील पाहणी करून समस्या सोडविली जातील.

श्री.अजीम अहेमद : 8.25 कोटी कंपनीला दिले समांतर एजन्सी काम का करीत नाही.

शहर अभियंता : अेएसओजीचे रक्कम दिली त्यात कंपनीचा कर्मचारी पगार व ठराविक खर्च असतो त्यापोटी दिले आहे.

श्री.सिताराम सुरे : एसी लाईन बदण्याची तरतूद असावी.

मा.सभापती : पाणी खराब येते अनेक समस्या आहे अल्प मुदतीची निविदा काढून जेथे घाण पाणी येथे तेथील कामे तातडीने करावी.

श्री.रावसाहेब आमले : वार्ड 14,15 साठी छावणी भागातून लाईन आहे. या लाईनवर अनधिकृत नळ कनेक्शन मोठया प्रमाणात आहे.आमच्या वार्डात पाणी येत नाही.

उपअभियंता (श्री.चहल) : शांतीपूरा भागातील काही नळ मागे कट केले होते.

मा.सभापती : तातडीने कार्यवाही करावी अनधिकृत नळ कनेक्शन काढावेत.

श्री.कैलास गायकवाड : गुंठेवारी व टी पी विभागाकडून किती वसुली आलेली आहे.माझ्या माहिती प्रमाणे अधिकारी नाही ते येईपर्यत सभा 10 मिनिटासाठी तहकूब करावी.

श्री.राजगौरव वानखेडे : पुढील सभेत वसुली बाबत सविस्तर माहिती घ्यावी.

मा.सभापती : सर्व अधिकारी यांनी सभेला उपस्थित रहावे पुढील सभेत वसुली बाबत माहिती दयावी.

प्र.सहा.संचालक (न.र) : गुंठेवारीची वसुली वगैरे हे वार्ड कार्यालय लेव्हलवर काम चालते माहिती घेऊन दिली जाईल.

श्रीमती समीना शेख : साप्ताहिक अहवाल दिलेला आहे एकूण किती रक्कम जमा आहे.

मा.सभापती : पहिल्यादांच साप्ताहिक अहवाल सादर होत आहे सदस्यांचे समाधान झाले प्रशासनाचेही धन्यवाद.

श्रीमती समीना शेख : स्थायी समितीच्या पुर्व परवानगी शिवाय अति.कार्यभार अधिकारी यांना देऊ शकत नाही. कलम 53 (1) वाचून दाखवावे.

नगरसचिव : जो अधिकारी सहायक आयुक्त या पदाशी समतुल्य असलेल्या किंवा त्यापेक्षा उच्च दर्जाच्या पदावर आहे मग असे अधिकारी तात्पुरते असोत किवा कायम त्यांची नेमणूक करण्याचा अधिकारी मनपात निहित असेल.परंतु आयुक्ताला सहायक आयुक्त या पदाशी समतुल्य असलेल्या किंवा त्यापेक्षा उच्च दर्जाच्या पदावर असलेल्या कर्ज विषयक कामासाठी करावयाच्या कोणत्याही अस्थायी नेमणुका सहा महिण्याहून अधिक नसलेल्या कालावधीसाठी स्थायी समितीच्या पुर्व मंजूरीने या अटीवर करता येतील की आयुक्ताने अशी प्रत्येक नेमणूक करतांना त्या विषयी मनपास कळविले पाहिजे उक्त सहा महिन्याचा कालावधी संपल्यानंतर मनपाच्या पुर्व मंजुरीवाचून अशा कोणत्याही नेमणुकीचे नवीकरण करता येणार नाही.

श्री.राजगौरव वानखेडे :असे किती अधिकारी यांना अतिरिक्त चार्ज दिला,स्थायी समितीची परवानगी घेतली का?

उपआयुक्त(आस्थापना) : माहिती मागविली आहे 15-20 मिनिटात येईल.

मा.सभापती : पुढील सभेत माहिती दयावी.

श्रीमती किर्ती शिंदे : किती अधिकारी कर्मचारी निलंबीत आहे त्यांचा पगार देतो का त्यांना रूजू करून घेणार आहे का ?

श्री.राजगौरव वानखेडे : मनपाच्या शाळेची इमारत भाडेने देणे बाबत निविदा काढली काय कार्यवाही केली.

मालमत्ता अधिकारी : चार शाळोत विदयार्थी संख्या कमी होती.खोल्या जास्त व विदयार्थी संख्या कमी त्यमूळे उपआयुक्त शिक्षणाधिकारी यांनी अहवाल दिला की या शाळेच्या इमारती पडून आहे भाडे तत्वावर दिल्या तर उत्पन्न प्राप्त होऊ शकते त्यानुसार चार शाळांचे टेंडर काढले त्यापैकी एन-6 च्या शाळेचे टेंडर आले बाकी आले नाही संचिका मंजूरीसाठी आहे म्हणून स्थायी समिती समोर आले नाही.

मा.अति.आयुक्त : निविदा काढली होती परंतु असे लक्षात आले की ही महापालिकेची प्रॉपर्टी आहे महापालिकेच्या उपयोगाकरीता येईल.कार्यवाही थांबविली आहे.

श्री.राजगौरव वानखेडे : इमारतीचे टेंडर काढतांना विचार का केला नाही. नंदनवन कॉलनी प्रगती कॉलनी येथील शाळा निविदा न काढता भाडेने दिली हया इमारतीपण मनपाच्या होत्या एकाला एक नियम दुस-याला दुसरा नियम का? साई एजन्सीला टेंडर दिले होते कार्यवाही थांबविली की रद्य करीत आहोत म्हणून त्यांना का कळविले नाही. ही संस्था किती पैसे मनपास देणार होते.

उपआयुक्त (प्र) : सध्य स्थितीस माहिती उपलब्ध नाही.

मालमत्ता अधिकारी : प्रत्येक महिण्याला 1.24 लक्ष मिळणार होते.

श्री.राजगौरव वानखेडे : एन-6 शाळेत किती विदयार्थी आहे.तेथे लोक दारू पितात पत्ते खेळतात अशा कितीतरी इमारती पडून आहे मनपास उत्पन्न मिळू शकेल चार शाळा अगोदर भाडेने दिल्या ज्यांचे टेंडर काढले त्या इमारती का देत नाही.प्रगती कॉलनी नंदनवन कॉलनी शाळेच्या इमारतीतून किती उत्पन्न मिळते.एन-6 च्या शाळेचे संबधीतास निविदा मिळाली ते कोर्टात गेले तर महापालिकेचे उत्पन्न बुडणार आहे.

मालमत्ता अधिकारी : प्रगती कॉलनी शाळेपासून 2.40 लक्ष मिळत आहेत.

मा.सभापती : या संबधीत मा.आयुक्ताशी चर्चा करून निर्णय घेतला जाईल.

श्रीमती किर्ती शिंदे : डॉ.जयश्री कुलकर्णी यांची मुळ पोस्टींग कोणती होती आरोग्य वैद्यकीय अधिकारी पदावर एक अधिकारी कार्यरत असतांना डॉ.जयश्री कुलकर्णी यांना याच पदाचे वेतन कसे दिले गेले व असे वेतन देता येते का?

मा.सभापती : संबधीत अधिकारी यांनी पुढील सभेत माहिती सादर करावी.

श्री.विकास एडके : माझे वार्डात सीटीएस नंबर 2640 मध्ये अनधिकृत बांधकाम चालू आहे त्यास परवानगी नाही. गरीबाचे घर असेल तर लगेच तोडले जाते.यावर कार्यवाही का होत नाही.

उपआयुक्त(प्र) : या संबधीची तक्रार माझ्यापर्यंत आलेली नाही याची माहिती घेवून नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल.

या बरोबर राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा.सभापती यांनी घोषीत केले.

**(दिलीप सुर्यवंशी)**
नगर सचिव,
महानगरपालिका औरंगाबाद